# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ५५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.३० ऑक्टोबर, २०१३ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ५५वी बैठक बुधवार, दि.३० ऑक्टोबर, २०१३ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग | सदस्या |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ९) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. रोकडे एम. एस. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

सौ. पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. यांच्या अनुपस्थितीची बैठकीत नोंद घेण्यात आली.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.१९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ५४व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.१९ ऑक्टोबर, २०१३ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या ५४व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची बैठकीत नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] शै.वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय, विद्याशाखा व वाढीव तुकड्यांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहीत करण्याबाबतचा सुधारीत शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२/(२४७/१२) / मशि ४, दि.०२/०९/२०१३ माहितीस्तव व त्यानुसार कार्यवाही करण्यास मान्यतेसाठी.**

(टिपणी: शै.वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालय (व्यावसायिक व पारंपारीक), विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी, विद्याशाखांना मान्यता देणेकामी शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२ / (२४७ / १२) / मशि ४, दि.०२/०९/२०१३ निर्णयानुसार सुधारीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याबाबत सोबतच्या शासन निर्णयान्वये कळविण्यात आले आहे.

शै.वर्ष २०१४-१५ पासून या विद्यापीठाकडे प्राप्त होणाऱ्या नवीन (व्यावसायिक व पारंपारीक), विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी, विद्याशाखांना मान्यता सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव मागविताना व प्राप्त प्रस्तावांबाबत सोबत जोडलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी लागणार आहे.

त्यास अनसुरुन शै.वर्ष २०१४-१५ पासून (व्यावसायिक व पारंपारीक), विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी, विद्याशाखां सुरु करण्यासाठी प्रस्ताव स्विकारणेकामी सोबत जोडल्याप्रमाणे नियमावली व तपासणीसूची तयार करण्यात आली असून सदर नियमावलीनुसार प्रस्ताव स्विकारण्यास व यापूर्वीच संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी ज्या महाविद्यालयांकडून प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत अशा महाविद्यालयांकडून सुधारीत शासन निर्णयातील मुददयांनुसार पूर्तता करुन घेण्यास मा.कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय, विद्याशाखा व वाढीव तुकडयांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहीत करण्याबाबतचा सुधारीत शासन निर्णय क्रं एनजीसी २०१२ / (२४७ / १२) / मशि ४, दि.०२/०९/२०१३ माहितीस्तव व त्यानुसार कार्यवाही करण्यास मान्यतेस्तव).

**ठराव: शै.वर्ष २०१४-१५ पासून नवीन महाविद्यालये (व्यावसायिक व पारंपारिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम / विषय, विद्याशाखा व वाढीव तुकड्यांना मंजूरी देण्यासाठी कार्यपध्दती व निकष विहीत करण्याबाबतचा सुधारीत शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२/(२४७/१२) / मशि ४, दि.०२/०९/२०१३ या शासन निर्णयाची नोंद घेवून यानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०४ ] महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार द्वारे प्रसिध्द केलेली महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२ पोटकलम ५(ब) सुधारीत पोटकलम माहितीस्तव सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ द्वारे प्रसिध्द केलेली महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ क्रमांक ३५ याच्या कलम ८२ पोटकलम ५(ब) मध्ये केलेली सुधारणाची प्रत शासनाचे अवर सचिव यांनी मा. कुलगुरु यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केलेली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार द्वारे प्रसिध्द केलेली महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२ पोटकलम ५(ब) सुधारीत पोटकलम माहितीस्तव सादर).

**ठरावः महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार द्वारे प्रसिध्द केलेली महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२ पोटकलम ५(ब) सुधारीत पोटकलमाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः अधिसभा सदस्यांनी दि.१६ नोव्हेंबर, २०१३ रोजी होणाऱ्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामार्दिशनास्तव विचारार्थ).

**ठराव : सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
प्रश्नोत्तरे

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | | **डॉ. चव्हाण सी. एस.** | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १ | अधिसभा सदस्याने विद्यापीठ प्रशासनास एखादी माहिती मागितल्यास ती किती दिवसात देणे अपेक्षित आहे? | किती दिवसात द्यावी या संदर्भात नियमात कोणतीही तरतूद नाही. |
| | २ | ए. जी. पी. ९००० करिताचे प्लेसमेंट विद्यापीठाने केलेले नाही. तरी त्याकरिता प्लेसमेंट कॅम्प केंव्हा घेण्यात येणार आहे? | विद्यापीठाने ए. जी. पी. ७००० / ८००० करिताचे प्लेसमेंट दिनाक ०६/०९/२०१२ ते ०७/०९/२०१२ दरम्यान केलेले आहे.<br>AGP ९००० चे प्राध्यापकांच्या बाबत विद्यापीठ स्तरावर आढावा घेवून निर्णय घेण्यात येईल. |
| | ३ | रिसर्च प्लेस करिताची काही आर्थिक तरतुद करण्यात आली आहे काय? | होय |
| ● | | **श्री. कोकरे एम. बी.** | **ॲड. सलगर बी. एस.** |
| | ४ | वाणिज्य विद्याशाखा व विज्ञान विद्याशाखा अधिष्ठातांची नेमणूक कोणत्या अधिकारात केली आहे? | विज्ञान विद्याशाखा आणि वाणिज्य विद्याशाखा अधिष्ठातांची नेमणूक केलेली नाही. अधिष्ठातांचा पदभार देण्यात आलेला आहे. |
| | ५ | सन २०१३ या वर्षात स्थायी समिती मार्फत विविध अधिकार मंडळावरील किती रिक्त पदे भरलेली आहेत व कोणकोणती? | सन २०१३ या वर्षात आतापर्यंत एकही पद भरण्यात आलेले नाही. |
| | ६ | विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावरील कोणकोणत्या सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहे?<br>हे करताना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ पालन केला का?<br>परिनियम S-655 ला छेद दिलेला आहे का? | १) डॉ. भिमाशंकर बिराजदार<br>२) सौ.मिनाक्षी कदम<br>३) डॉ. ए. बी. सूर्यवंशी<br>होय<br>नाही |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. श्रीमती दळवी आर. जे.** | | **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.** |
| | ७ | कोणकोणत्या महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत? | दोन अनुदानित महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत. |
| | ८ | सोलापूर विद्यापीठामध्ये सर्व विद्याशाखांचे अनुदानित पदवीत्तर पदवी विभाग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही सुरु आहे? | विद्यापीठात भाषा व वाङ्मय संकुल, स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी आणि वाणिज्य व व्यवस्थापन संकुल अनुदानित तत्त्वावर सुरु करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत. |
| | **डॉ. कोळेकर टी. एन.** | | **डॉ. सूर्यवंशी एस. एस.** |
| | ९ | सोलापूर विद्यापीठ सोलापूर ने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला या आर्थिक वर्षात कोणत्या जातीची किती रोपे दिली? | सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सागवान या जातीची एकूण २५०० रोपे दिली. |
| | १० | सोलापूर विद्यापीठाने वाहन क्र. MH-13 AZ-9531 खरेदी करताना वित्त व लेखा समितीचे शासकीय प्रतिनिधी सदस्य यांनी विद्यापीठास हरकतीचे पत्र दिले होते, त्याचा आशय काय? | सोलापूर विद्यापीठाच्या कार्यालयीन वापराकरिता वाहन क्र. MH-13 AZ-9531 खरेदी करण्यासाठी विद्यापीठ शासन नियमानुसार सक्षम आहे का? असा आशय होता. |
| | ११ | डिसें २०१२ ते जाने २०१३ मधे सोलापूर विद्यापीठामार्फत राज्य शिक्षक पुरस्कारासाठी कोणकोणत्या शिक्षकांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यात आले होते, त्यांचे गुणदान तक्त्यासह गुण किती? | सोलापूर विद्यापीठामार्फत सन २०१२-१३ च्या राज्य शिक्षक पुरस्कारासाठी खालील शिक्षकांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यात आले होते. त्यांचा गुणदान तक्त्यासह गुण खालीलप्रमाणे: |

१) डॉ. तानाजी नारायण लोखंडे, सहयोगी प्राध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १४ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०५ |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्दी | १५ | ०८ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ८२ |

| | २) डॉ. शरद शिवाजी सूर्यवंशी, सहयोगी प्राध्यापक, पदार्थविज्ञान संकूल, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १६ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०५ |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्द्ी | १५ | ०५ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ८१ |

| | ३) डॉ. तानाजी नारायण कोळेकर, सहायक प्राध्यापक, डी. बी. एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | १० |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १४ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०० |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्द्ी | १५ | १० |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | १५ |
| | एकूण | १०० | ७४ |

| ४) डॉ. सूर्यकांत बाळासाहेब घुगरे, सहयोगी प्राध्यापक, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी, जि.सोलापूर | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | निकष | गुणांक | समितीने दिलेले गुण |
| १ | शिक्षकाने त्यांच्या विषयात शोधनिबंध प्रकाशित केलेले असावेत | २० | ०५ |
| २ | विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | २० | १६ |
| ३ | शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांचे मागील ५ वर्षातील प्रमाण (८०% जास्त असल्यासच गुण मिळतील) | २० | २० |
| ४ | पीएच. डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झाले असल्यास | ०५ | ०५ |
| ५ | किमान २ विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | ०५ | ०० |
| ६ | शिक्षकाने त्याच्या अध्यापन क्षेत्रात केलेले संशोधनपर कार्य शोधनिबंध व त्याची प्रसिध्द्ी | १५ | १५ |
| ७ | आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनार मध्ये सादर / प्रसिध्दी केलेले संशोधनपर पेपर्स | १५ | ०५ |
| | एकूण | १०० | ६६ |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **डॉ. शिंदे एस. व्ही.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | १२ | विद्यापीठ क्षेत्रातील कोणकोणत्या महाविद्यालयात प्रोफेसरची पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे? | कोणत्याही महाविद्यालयात प्रोफेसरची पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. |
| | १३ | प्रोफेसरची पदे भरताना CAS व Direct भरतीचे निकष तयार करण्यात आले आहेत काय? | नाही. |
| | १४ | प्रोफेसरच्या भरतीमध्ये राखीव जागांबाबत नियमावली तयार केली आहे काय? | नाही. |
| ● | **श्री. गायकवाड आर. एस.** | | **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.** |
| | १५ | किती संलग्नीत महाविद्यालयात शारिरीक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत? | दोन महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकाच्या नेमणूका झालेल्या नाहीत. |
| | १६ | किती महाविद्यालयात शारिरीक शिक्षण संचालकाना नियत वयोमानानुसार वाढ दिलेली नाही? | एक |
| | १७ | विद्यापीठात शारिरीक शिक्षण विभाग करण्यासंबंधी कोणते प्रयत्न झाले आहेत? | विद्यापीठात शारीरिक शिक्षण विभाग सुरु करण्यासंबंधी प्रस्ताव सादर करण्यात आला नाही. |
| ● | **डॉ. भोसले यु. व्ही.** | | **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १८ | विद्यापीठ परीक्षांचे निकाल लागल्यानंतर विविध वर्गांचा निकाल किती टक्के लागलेला आहे. याची माहिती सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविली जाते काय? | होय. |
| | १९ | विद्यापीठ परीक्षांचे निकाल लागल्यानंतर पदवी व पदव्युत्तर वर्गांची गुणवत्ता यादी महाविद्यालयांना कळविली जाते काय? | होय. |
| | २० | बी. ए. भाग दोन या वर्गासाठी आयडी एस् विषयांसाठी वेगवेगळ्या ऐच्छिक विषयांचे गट तयार केले आहेत काय? | केले आहेत. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- | --- |
| ● | **श्री. चौगुले एस. एस.** | | **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | २१ | विद्यापीठासमोर राज्य परिवहन मंडळाच्या बसेस थांबल्या पाहिजेत यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्न केले गेले आहेत काय? | होय. |
| | २२ | विद्यापीठामार्फत केल्या जाणाऱ्या कामाच्या निविदा मागविण्याचे नियम काय आहेत? | समान लेखा संहितेत नियम आहेत. |
| | २३ | निवीदा न मागविता २०१२-१३ या वर्षात विद्यापीठाने कोणकोणती कामे केली आहेत? | कोणतेही नाही. |
| ● | **डॉ. बचुटे एम. टी.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | २४ | विद्यापीठास १२ ब चा दर्जा मिळाल्यानंतर विद्यापीठाने, विद्यापीठ अनुदान मंडळाकडून अनुदान प्राप्त करण्यासाठी कोणकोणते प्रस्ताव दाखल केले आहेत? | विद्यापीठास १२ ब चा दर्जा मिळाल्यानंतर विद्यापीठाने, XII[th] Five Year Plan General Development Assistance या अंतर्गत Scenario I नुसार अंदाजे रु.१३६ कोटी, Scenario II नुसार अंदाजे रु.२२४ कोटीचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली येथे अनुदान प्राप्तीसाठी दि.२९/०८/२०१३ रोजी दाखल करण्यात आला आहे. |
| | २५ | वेगवेगळ्या अधिकार मंडळावरील सदस्य सलग किती बैठकांना गैरहजर असल्यास त्यांचे सदस्यत्व रद्द केले जाते? | पूर्वपरवानगीशिवाय लागोपाठच्या तीन बैठकींस. |
| | २६ | विद्यापीठात जुन २०१४ पासून कोणकोणत्या विषयांचे पदव्यूत्तर विभाग सुरु केले जाणार आहेत? | जे विषय / संकूल यांना अनुदानित तत्त्वावर शासन मान्यता मिळेल ते विषय / संकुल जून २०१४ पासून विद्यापीठात पदव्युत्तर विभाग म्हणून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ● | **डॉ. बाड डी. आर.** | | **ॲड. सलगर बी. एस.** |
| | २७ | सन २००८-०९ ते सन २०११-१२ अखेर विद्यापीठाने भरती केलेल्या स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे? | सन २००८-०९ ते सन २०११-१२ अखेर विद्यापीठाने भरती केलेल्या स्थायी केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या (१५७-४१) ११६ आहे. |
| | २८ | विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाच्या बैठका वेळेवर घेतल्या जातात काय? | होय. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | २९ | विद्यापीठाने भरती केलेले व शासनाच्या लेखापालाने वेतन अमान्य केलेले कर्मचारी कायद्यानुसार अपात्र आहेत काय? | विद्यापीठाने मा. संचालक (उ. शि.) पुणे यांचेकडे अपील सादर केले असून अपीलाचा निर्णय अप्राप्त आहे. |
| | **<u>श्री. शिंदे आर. बी.</u>** | | **<u>ॲड. सलगर बी. एस.</u>** |
| | ३० | सोलापूर विद्यापीठास नागरिकांची सनद (Public Charter) लागू आहे काय? | सोलापूर विद्यापीठास नागरिकांची सनद (Public Charter) लागू आहे. |
| | ३१ | विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या केंद्रामध्ये अध्यापन करणाऱ्या अध्यापकांची शैक्षणिक आर्हता काय आहे? | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१३ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार. |
| | ३२ | विद्यापीठ भरतीप्रक्रियेत यापूर्वीच्या कुलसचिव पदाच्या अर्जाची छानणी करतांना हेतूपूरस्कर अपात्र उमेदवारांची छानणी करुन विद्यापीठाच्या नियमांचा भंग केल्या प्रकरणी संबंधीत छाणनी व निवड समितीवर काय कारवाई केली? | प्रकरण प्रलंबित आहे. |
| • | **<u>डॉ. बारबोले ए. एन.</u>** | | **<u>डॉ. सूर्यवंशी एस. एस.</u>** |
| | ३३ | विद्यापीठातील अथवा विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राध्यापक अथवा कर्मचारी निवडतांना विद्यापीठातील कार्यरत अधिकारी व विद्यापीठाने नियुक्त केलेल्या निवड समिती सदस्यांनी विद्यापीठाचे नियम, आचारसंहीता व मार्गदर्शक तत्वे विचारात न घेता नियबाह्य काम केले आहे काय? | नाही. |
| | ३४ | विद्यापीठातील सहाय्यक, सहयोगी अथवा व प्राध्यापक या पदावरील नियुक्त कर्मचाऱ्याना युजीसी, महाराष्ट्र शासन व विद्यापीठाने प्राधिकरणात मंजूर करुन सर्वांना लागू केलेल्या नियमांतील तरतुदीनुसार एक वर्ष परिविक्षाधीन (Probation) कालावधी साठीचा नियुक्ती आदेश दिला आहे का? | नाही. |
| | ३५ | विद्यापीठ अनुदान आयोगाची व संबंधीत राज्य सरकारची मान्यता असलेल्या एखाद्या खाजगी विद्यापीठाची पीएच्.डी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी (त्याच विद्यापीठातंर्गत) मान्यता (Guideship) मिळविणे नियमबाह्य आहे काय? | नाही |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ● | **श्रीमती विभूते एस. बी.** | | **डॉ. लोणीकर एस. व्ही.** |
| | ३६ | सोलापूर विद्यापीठ परिपत्रक सोविसो/परीक्षा विभाग/ २०१३-५७७ दि.१८ जून २०१३ नुसार विद्यार्थ्यांच्या (अनुऊत्तीर्ण) परीक्षेला बसण्याच्या संधी कमी करण्यात विद्यार्थ्यांचे हीत आहे काय? | अहित नाही. |
| | ३७ | एखाद्या महाविद्यालयातील प्राध्यापकाला नियमबाह्य वागणूक दिल्याचे व्यवस्थापन परिषदेपुढे सिध्द् झाल्याने व्यवस्थापन परिषदेने सदरचे प्रकरण संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या व प्राध्यापकाच्या लेखी आश्वासनानंतर निकाली काढले असतांना स्टॅट्यूट - 216A नुसार चौकशी समितीसाठी विद्यापीठ संबंधीत महाविद्यालयाला कोणत्या नियमानुसार वारंवार प्रतिनिधी विद्यापीठाकडून देत आहे? | विद्यापीठ प्रतिनिधी देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | ३८ | कांही अनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची निवड करतांना निवड समितीने API पुर्ण करण्याच्या अटीवर निवड करुन मान्यतेसाठी विद्यापीठाकडे शिफारस केली आहे काय? | नाही. |

***

**<u>मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

[ ६(१) ] **प्रस्तुत विद्यापीठाकडे जमा असलेल्या आविष्कार रक्कमेतून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे आयोजित** Inclusive Innovation-2013 **कार्यक्रमाकरीता रु.५,००,०००/- देण्याची व उर्वरित रु.२५,२१,६९७/- एवढया रक्कमेचे मा.राज्यपाल कार्यालयाच्या निर्देशानुसार खर्च करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात सन २०१० मध्ये राज्यस्तरीय आविष्कार महोत्सव संपन्न झाला असून महोत्सवासाठी रु.५३,९१,६९८/- इतका फंड जमा झाला होता. त्यापैकी रु.३०,२१,६९७/- इतका फंड विद्यापीठाकडे शिल्लक आहे. त्या शिल्लक फंडातून Seminar/Conferences/Purchasing small equipment इत्यादी बाबींकरीता खर्च करण्याबाबतचे निर्देश मा.राज्यपाल कार्यालयाकडील दि.२५ सप्टेंबर, २०१३ च्या पत्रान्वये प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने शिल्लक रक्कमेतून नमूद केलेल्या बाबींकरीता खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यासाठी १. डॉ. एस.एस. सुर्यवंशी (अध्यक्ष), २. डॉ. ए.ए. घनवट (सदस्य), ३. श्री. आर.एस. मेंते (सदस्य) आणि ४. डॉ. व्ही.पी. उबाळे (सदस्य) यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

तथापि, मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी दि.०८/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दि.१० व ११ डिसेंबर, २०१३ रोजी होणाऱ्या Inclusive Innovation-2013 कार्यक्रमासाठी विद्यापीठाकडे जमा असलेल्या आविष्कार रक्कमेतून रु.५,००,०००/- इतक्या रक्कमेची मदत म्हणून मागणी केलेली आहे.

**सबब, विद्यापीठाकडे जमा असलेल्या आविष्कार रक्कमेतून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे आयोजित** Inclusive Innovation-2013 **कार्यक्रमाकरीता रु.५,००,०००/- देण्याची व उर्वरित रु.२५,२१,६९७/- एवढया रक्कमेचे मा.राज्यपाल कार्यालयाच्या पत्रानुसार निर्देशित बाबींकरीता खर्च करण्याकरीता नियुक्त केलेल्या समितीकडून अहवाल प्राप्त होताच त्यानुसार खर्च करण्याची बाब विचारार्थ).**

ठरावः **मा. कुलपती कार्यालयाची मान्यता घेवून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना Inclusive Innovation-2013 या कार्यक्रमाकरिता ₹३,००,०००/- देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ६(२) ] दि.१६/१०/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषद ठराव क्र.१७ अन्वये विद्यापीठ परीक्षा विभागास आवश्यक असणारे DATA CENTER एका वर्षाकरिता भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली होती यास अनुसरुन सहा महिने मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता परीक्षा विभागास आवश्यक असणारे DATA CENTER व्यवस्थापन परिषदेच्या विषय व ठराव क्र.१७ च्या मान्यतेस्तव अनुसरुन M/S. Grace Works Information Systems Mumbai. या फर्मसोबत करारनामा करुन रु.४०,०००/- प्रतिमहीना तसेच DATA CENTER साठी लागणाऱ्या सर्व सुविधा व २ Core ऐवजी ४ Core आणि ८ GB RAM सह भाडेतत्वावर घेण्यात आले होते. सदर करारनामाची मुदत दि.२२/११/२०१३ रोजी संपणार आहे.

सबब, विभागाकडील कामाकरिता सदर DATA CENTER आणखी सहा महिने भाडेतत्वावर घेण्यासाठी दि.२९/१०/२०१३ रोजीच्या टिपणीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर DATA CENTER आणखी सहा महिने भाडेतत्वावर घेण्यासाठी मुदतवाढ घेणे गरजेचे आहे आणि सदर फर्मने मागील दराने सेवा देण्याबाबत पत्र देवून सेवा देण्याची तयारी दर्शविली आहे. वरील कामासाठी सहा महिन्यासाठी रु.२,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च विभागाकडील खालील अंदाजपत्रकीय शिर्षकातून खर्ची टाकावा लागणार आहे.

| Budget Head | Data Center Rent |
|---|---|
| Provision | ६,००,०००/- |
| Expenditure | २,४०,०००/- |
| Balance | ३,६०,०००/- |

उपरोक्त फर्मकडून DATA CENTER भाडेतत्वावर घेण्यासाठी सहा महिन्याची मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: M/S. Grace Works Information Systems Mumbai या फर्मकडून भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या Data Center च्या करारास सहा महिने (दि.२२/०५/२०१४ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली.**

**[ ६(३) ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(f) मधील तरतुदीनुसार ॲक्सीस बँक यांचे ॲग्रीगेटर PayU यांचेबरोबर नेट बँकिंग सुविधा उपलब्ध करणेसाठी लिगल ॲग्रीमेंट केल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठाचा नववा पदवीदान समारंभ २९ नोव्हेंबर २०१३ रोजी संपन्न होणार असून सदर पदवीदान समारंभासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येत असून त्यासाठी ॲक्सीस बँकेने यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांचा डेमो विद्यापीठात येऊन दाखविला होता. त्यानुसार सदर बँकेच्या सेवेचा उपयोग घेण्याकरिता येथे खाते उघडावे व पेमेंट गेट वे सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी दि.०७/१०/२०१३ रोजीच्या टिपणीस मा.कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार ॲक्सीस बँक, शाखा डफरीन चौक येथे खाते उघडण्यात आले आहे. नेट बँकिंग सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता ॲक्सीस बँकेची ॲग्रीगेटर संस्था PayU यांचे सोबत लिगल ॲग्रीमेट करुन घ्यावे असे शाखा व्यवस्थापक यांनी दि.२३/१०/२०१३ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविले आहे. त्यास अनुसरुन नेट बॅंकिंग सुविधा सदर खात्यास उपलब्ध करुन घेण्यासाठी PayU यांचे सोबत लिगल ॲग्रीमेंट करुन घेण्याकरीता ॲक्सीस बँकेने दिलेल्या खालील नमुन्यात व्यवस्थापन परिषदेमध्ये ठराव करणे आवश्यक आहे.

Resolved that the consent of the University be and is hereby accorded to enter into an agreement with IBIBO Web Pvt. Ltd**,** Delhi for availing of payment gateway services on terms and conditions as specified in the agreement.

Further resolved that **Mr. Malik S. Rokade - Finance & Accounts Officer and Mr. Rajeev U. Khapale - Accountant** of the Solapur University be and are hereby jointly & severally authorized to sign and execute on behalf of the University, all agreements, undertakings and any other documents that may be necessary for availing the said services from IBIBO Web Pvt. Ltd. And to do all such acts that may be necessary to implement the foregoing resolution.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(एफ) नुसार "विद्यापीठाच्या वतीने करार करणे, त्यात फेरबदल करणे, ते पार पाडणे व रद्द करणे" यांचा अधिकार व्यवस्थान परिषदेला आहे. सुविधा मिळाल्यानंतर विद्यापीठास नेट बॅंकिंगद्वारे रक्कम स्विकारता येणार आहे. बँकेच्या स्वाक्षरीचे अधिकार लेखापाल व वित्त व लेखा अधिकारी यांना असल्यामुळे त्यांनी सदर करारावर विद्यापीठाच्या वतीने स्वाक्षरी करावी असे मा.शाखा व्यवस्थापक यांनी दि.२५/१०/२०१३ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविले आहे.

तरी सदरची बाब तातडीची असल्याने मा.कुलगुरु महोदय यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मान्यता दिली असून त्याप्रमाणे लिगल ॲग्रीमेंट करण्यात आले आहे.

**सबब, शाखा व्यवस्थापक यांनी ई-मेलद्वारे कळविल्यानुसार PayU यांचेबरोबर सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे मा.कुलगुरु महोदयाच्या मान्यतेने लिगल ॲग्रीमेंट केल्याची बाब माहितीस्तव).**

**ठराव: मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ६(४) ] आय.डी.बी.आय. बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे विद्यापीठ परिसरात बँक शाखा सुरु करणेस प्राप्त झालेले प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात बँक शाखा उघडण्यास आय.डी.बी.आय. बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांचेकडून विद्यापीठास देण्यात येणाऱ्या सुविधांसह प्रस्ताव प्राप्त झाले आहेत ते सोबत अवलोकनार्थ सादर.

वरील दोन्ही बँकानी बँक शाखेसाठी विद्यापीठ परिसरात शाखेची इमारत बांधणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत व विद्यापीठास देण्यात येणाऱ्या सवलतीसह प्रस्ताव सादर केले आहेत. विद्यापीठाने जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर इमारत बांधकामाचा खर्च बँक स्वत: करणार आहे. विद्यापीठ परिसरात बँक शाखा उघडण्यास बँकेस मान्यता दिल्यास विद्यापीठ प्रशासनास, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना सोयीचे होणार आहे. तसेच बॅकेस शाखा उघडणेस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यास सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठवावा लागणार आहे.

**सबब, आय.डी.बी.आय. बँक व बँक ऑफ महाराष्ट्र यांचे विद्यापीठ परिसरात बँक शाखा सुरु करणेस प्राप्त झालेले प्रस्ताव विचारार्थ).**

**ठराव: विद्यापीठ परिसरात बँक ऑफ महाराष्ट्राची शाखा सुरु करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेनंतर बँकेस ६,००० स्क्वेअर फूट जागा देण्यासाठी मान्यता देण्यात आली.**

**[ ६(५) ] परीक्षा नियंत्रक या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडील परीक्षा नियंत्रक हे संवैधानिक पद भरण्याकरिता दिनांक २२/१०/२०१३ रोजी दैनिक सकाळ, इंडियन एक्सप्रेस व लोकसत्ता या दैनिकामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे. तसेच AIU, New Delhi या मासिकामध्यें व विद्यापीठ संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक २०.११.२०१३ रोजी पर्यंत ठेवण्यात आलेली आहे. सदर पदाच्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः परीक्षा नियंत्रक या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**१) डॉ. एस. एस. सूर्यवंशी**
**२) डॉ. टी. एन. शिळीमकर**

**[ ६(६)] वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडील वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद भरण्याकरिता दिनांक २२/१०/२०१३ रोजी दैनिक सकाळ, इंडियन एक्सप्रेस व लोकसत्ता या दैनिकामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे. तसेच AIU, New Delhi या मासिकामध्यें व विद्यापीठ संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर पदासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक २०/११/२०१३ रोजी पर्यंत ठेवण्यात आलेली आहे. सदर पदाच्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**१) श्री. बी. आर. गायकवाड**

**२) डॉ. ए. ए. शेख**

**[ ६(७)] आंतरराष्ट्रीय युवा फेलोशिप संस्थेने दक्षिण कोरिया येथे दि.०६ जुलै ते १८ जुलै, २०१३ या कालावधीत जागतिक शिबीराचे आयोजन केले होते. सदर शिबीरामध्ये सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु सहभागी झाले होते. सदर ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी झालेल्या हवाई प्रवासाच्या (By Air) देयकाच्या मान्यतेबाबत.**

(टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांच्या पत्रान्वये कळविल्या नुसार मुनटॅक पार्क, चेअरमन, आंतरराष्ट्रीय युवा फेलोशिप यांनी दक्षिण कोरिया येथे आयोजित केलेल्या "२०१३ World Ministers and University Vice-Chancellor's" Forum" शिबीरामध्ये (पत्र दि.२३/०५/२०१३) सहभाग नोंदविण्यासाठी दि.११ जुलै ते १८ जुलै, २०१३ या कालावधीत दक्षिण कोरिया, सेऊल येथे उपस्थित होते. सदर शिबीराचा हेतू कोरिया आणि अन्य देशामधील युवकांचा विकास करण्यासाठी सातत्याने सहकार्य ठेवणे आणि ग्लोबल कोरिया स्कॉलरशिप, "ऑफीसीयल डेव्हलपमेंट असिस्टंट" हा होता. सदर शिबीरास उपस्थित राहण्यासाठी शासनाने दि.०३/०७/२०१३ चे पत्रानुसार व मा. कुलपती यांनी (दि.२६/०६/२०१३ पत्रानुसार) मा. कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ यांचे मानांकन मंजूर केले आहे. त्यामुळे शिबीरास उपस्थित राहण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांनी मुंबई ते दक्षिण कोरिया आणि परत दक्षिण कोरिया ते मुंबई असा विमानाने प्रवास केलेला आहे. सदर शिबीरात अंदाजे २० मंत्रीमहोदय व ५० विद्यापीठाचे कुलगुरु उपस्थित होते. सदर प्रवासाकरिता एकूण हवाई तिकीटाचा (Air Ticket) खर्च रु.६२,५१४/- (अक्षरी- रु. बासष्ठ हजार पाचशे चौदा फक्त) इतका झालेला असून सदरचा खर्च हा मा.कुलगुरु महोदयांनी स्वतः केलेला आहे. त्याकरिता त्यांनी गिरीकंद ट्रॅव्हल्स यांचे देयक सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, धनादेश क्र.२३५०६१ दि.२०/०७/२०१३ अन्वये अदा केलेले आहे.

In recognition of contribution and input to the success of the "2013 Minister of Youth World Forum / World Education Leaders Forum" from July 11th through July 17th; "Plaque of Appreciation" was presented to Prof. Dr. N. N. Maldar, Vice-Chancellor of Solapur University, India by the chairman of International Youth Fellowship Advisory Committee, Mr. Ock Soo Park. Prof. N. N. Maldar also participated in the 2013 world culture camp Korea from July 14th to July 17th, 2013; wherein Prof. N. N. Maldar imparted upon the youths wisdom and healthy mindset and provided the hope and inspiration to the youths of the world.

सबब, सदर खर्चास व देयकास व्यवस्थापन परिषदेची मान्यता असावी. तसेच मान्यतेनंतर झ ाालेला उपरोक्त खर्च रु.६२,५१४/-(रु. बासष्ठ हजार पाचशे चौदा फक्त) प्रा. डॉ. एन. एन. मालदार, कुलगुरु सोलापूर विद्यापीठ यांना धनादेशाद्वारे अदा करण्यास आणि झालेला प्रवास खर्च हा विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रवास भत्ते या शिर्षकाखाली खर्ची टाकण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

ठरावः **आंतरराष्ट्रीय युवा फेलोशिप संस्थेने दक्षिण कोरिया येथे दि.०६ जुलै ते १८ जुलै, २०१३ या कालावधीत आयोजित केलेल्या जागतिक शिबीरामध्ये सहभागी झालेल्या या विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या हवाई प्रवासाच्या देयकास मान्यता देण्यात आली तसेच सदरचा खर्च कुलगुरुंनी स्वतः केलेला असल्याने ₹६२,५१४/-चा परतावा त्यांना आदा करण्यास व झालेला प्रवास खर्च हा विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रवास भत्ते या शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |